NAAC "A++" Grade with CGPA 3.52

# Shivaji University, Kolhapur

## National Science Week

**22 – 28 February 2022**

## Synergistic Training Program Utilizing the Scientific and Technological Infrastructure (STUTI)

**Organized by**

**SAIF DST Center, Shivaji University, Kolhapur.**

**Media Publicity by**

**Dept. of Journalism and Mass Communication**

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
## DEPARTMENT OF JOURNALISM & MASS COMMUNICATION
## NATIONAL SCIENCE - DAY MEDIA COVERAGE
## 22 to 28 Feb 2022

| अ.क. | मथळा | वृत्तपत्राचे नाव | दिनांक | पान नं |
|---|---|---|---|---|
| 1 | विद्यापीठात उद्यापासून विज्ञान जागृती सप्ताह | **Daily Lokmat** | 21–02–2022 | 1 |
| 2 | विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे उद्या उद्घाटन | **Daily Tarun Bharat** | 21–02–2022 | 2 |
| 3 | विद्यार्थ्यांनमध्ये विज्ञानविषयक जागृती करा :डॉ श्याम कोहली | **Daily Lokmat** | 22–02–2022 | 2 |
| 4 | विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे आज उद्घाटन | **Daily Tarun Bharat** | 22–02–2022 | 3 |
| 5 | विज्ञान जागृती सप्ताह आजपासून | **Sakal** | 22–02–2022 | 3 |
| 6 | पर्यावरणाचे संरक्षण समाजाची जबाबदारी : डॉ श्याम कोहली | **Daily Tarun Bharat** | 22–02–2022 | 4 |
| 7 | सौर उर्जेचा वापर केल्यास भारत जगात अव्वल :किरण ठाकूर | **Daily Tarun Bharat** | 22–02–2022 | 5,6 |
| 8 | विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानाच्या संधी पोहचवा : डॉ श्याम कोहली | **Punyanagari** | 24–02–2022 | 7 |
| 9 | वैज्ञानिक दृष्टिकोन जपाः डॉ. शिंदे | **Pudhari** | 24–02–2022 | 7 |
| 10 | विद्यार्थ्यांत विज्ञानसंधी पोचवाव्यात : डॉ श्याम कोहली | **Punyanagari** | 24–02–2022 | 8 |
| 11 | वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक : डॉ.व्ही.एन. शिंदे | **Punyanagari** | 26–02–2022 | 9 |
| 12 | वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक : डॉ शिंदे | **Pudhari** | 26–02–2022 | 9 |
| 13 | संशोधनातील सर्व क्षेत्रात गणित गरजेचे : डॉ. मव्दाना | **Sakal** | 26–02–2022 | 10 |
| 14 | उच्च माध्यमिक शिक्षणात गणित विषय सोडू नका : मव्दाना | **Daily Lokmat** | 26–02–2022 | 10 |
| 15 | विज्ञान शाखेत गाणित अपरिहार्य : प्रा मव्दाना | **Punyanagari** | 27–02–2022 | 11 |
| 16 | संशोधन क्षेत्र बुध्दिवंतांचे हा गैरसमज : डॉ. माधुरी शानबाग | **Daily Tarun Bharat** | 27–02–2022 | 11 |
| 17 | संशोधन क्षेत्र बुध्दिवंतांचेच हा गैरसमज : डॉ. माधुरी शानबाग | **Daily Lokmat** | 27–02–2022 | 12 |
| 18 | संशोधन क्षेत्र बुध्दिवंतांचेच हा गैरसमज काढून टाका : प्राचार्या शानबाग | **Pudhari** | 27–02–2022 | 12 |
| 19 | देश अन् समाजाशी अतुट नाळ असलेला शास्त्रज्ञ :डॉ.आर. जी. सोनकवडे | **Daily Tarun Bharat** | 28–02–2022 | 13 |
| 20 | छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका : प्रा. बी. एन. जगताप | **Daily Tarun Bharat** | 01–03–2022 | 14 |
| 21 | छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिकावी : प्रा. बी. एन. जगताप | **Pudhari** | 03–03–2022 | 15 |

**NAAC "A++" Grade with CGPA 3.52**

**Shivaji University, Kolhapur**

**National Science Week**

**22 – 28 February 2022**

**Synergistic Training Program Utilizing the Scientific and Technological Infrastructure (STUTI)**

# News Portal and local Chanel Media Publicity Link :-

1. *विज्ञानाबाबत लोकांच्या मानसिकतेत बदल होणे गरजेचे - श्याम सुंदर कोहली* http://marathiyan.com/index.php?news=17017

2. *परीघा बाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान पोहचावे - शाम सुंदर कोहली* http://marathiyan.com/index.php?news=17019

3. S news 21-02-22 विज्ञान जागृती सप्ताहास शिवाजी विद्यापीठात सुरुवात https://youtu.be/34W4wZIac6c

4. B news 22-02-22 https://youtu.be/HUip2V6AyO4

5. *वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक : डॉ. व्ही. एन. शिंदे* http://marathiyan.com/index.php?news=17046

6. *विज्ञान जागृती सप्ताह, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर l दिवस 2 l Tarun Bharat News* https://fb.watch/bpUpNjtYNk

7. *विज्ञान जागृती सप्ताह, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर l दिवस 3 l Tarun Bharat News* https://fb.watch/bpUtDOKrMc/

8. B News https://youtu.be/EBvPN3IfM3M

9. *छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका - जेष्ठ शास्त्रज्ञ बी. एन. जगताप* http://www.marathiyan.com/index.php?news=17152

# विद्यापीठात उद्यापासून विज्ञान जागृती सप्ताह

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या वैज्ञानिक व तांत्रिक पायाभूत सुविधा प्रशिक्षण (एसटीयुटीआय) कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ ते २८ फेब्रुवारीदरम्यान विज्ञान जागृती सप्ताह आयोजित केला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या एसएआयएफ-डीएसटी केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

राजर्षी शाहू सभागृहामध्ये सप्ताहाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे व विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार शाम सुंदर कोहली यांच्या उपस्थितीत होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रास्ताविक करणार आहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षानिमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम देशभरात प्रदेशात सुरू आहे. याअंतर्गत केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान. मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे, यासाठी १३ केंद्रांवर हा उपक्रम राबविला जात आहे. अकृषी विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा एकमेव समावेश या उपक्रमात आहे.

सप्ताहात अनुक्रमे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. आर. के. कामत, प्रा. व्ही. ए. बापट, लेखिका डॉ. माधुरी शानभाग, डॉ. एम व्ही टाकळे, मराठी विज्ञान विश्वकोशच्या जीवशास्त्र ज्ञानमंडळाचे अध्यक्ष डॉ. मोहन मदवण्णा यांचे व्याख्यान होणार आहे.

विज्ञान व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन मिळावे, यासाठी डॉ आर. जी. सोनकवडे यांचे विशेष प्रयत्न सुरू आहेत. यासाठीच विद्यापीठाच्या अनेक उपक्रमांत डॉ. सोनकवडे यांनी केलेल्या सादरीकरणामुळेच विद्यापीठाचा समावेश या सप्ताहामध्ये केला आहे. कोविड नियमावली पाळून विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**Lokmat 21/02/2022**

2

# विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे उद्या उद्घाटन

## विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ- डीएसटी केंद्राच्या वतीने २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन २२ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार शाम सुंदर कोहली, 'तरुण भारत'चे समूहप्रमुख व सल्लागार संपादक किरण ठाकूर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती एसएआयएफ- डीएसटी केंद्राचे संचालक डॉ आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

### विज्ञान आणि तंत्रज्ञानाला प्रोत्साहन मिळावे

भारताच्या विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा यासाठी शिवाजी विद्यापीठतील एसएआयएफ- डीएसटी केंद्राचे संचालक डॉ आर. जी. सोनकवडे ह विशेष प्रयत्न करीत आहेत. यासाठीच विद्यापीठाच्या अनेक उपक्रमामध्ये डॉ. सोनकवडे यांनी केलेल्या सादरीकरणामुळेच विद्यापीठाचा समावेश विज्ञान जागृती सप्ताहामध्ये झाला आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशातील सर्व राज्यात विज्ञान सप्ताहाचे आयोजन केले आहे. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे यासाठी देशभरातील १३ केंद्रांवर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. अकृषी विद्यापीठांमध्ये राज्यातील शिवाजी विद्यापीठ एकमेव केंद्र आहे. या सप्ताहात शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर के कामत, जैवतंत्रज्ञान विभागाचे डॉ. व्ही. ए. बापट, विज्ञान विषयक लेखिका डॉ. माधुरी शानभाग, भौतिक शास्त्र विभागाचे डॉ. टाकळे, मराठी विज्ञान विश्वकोश मंडळाच्या जीवशास्त्र ज्ञानमंडळाचे अध्यक्ष डॉ. मोहन मदवण्णा यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. १४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील सुमारे ७०० विद्यार्थी सहभागी नोंदवणार आहेत.

**Tarun Bharat 21/02/2022**

# विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयक जागृती करा

## श्याम कोहली : शिवाजी विद्यापीठात विज्ञान सप्ताहाचा प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध साधन-सुविधांचा लाभ संशोधक विद्यार्थ्यांना करून शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयक प्रसार, जागृती आणि गोडी निर्माण करण्यासाठी त्यांच्यापर्यंत ही माहिती पोहोचविण्याचे काम विद्यापीठांनी करावे, असे आवाहन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांनी येथे केले.

'आजादी का अमृतमहोत्सवा'निमित्त डीएसटी-स्तुती कार्यक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठात आयोजित विज्ञान जागृती सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठीय परीघाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानातील संधींची माहिती पोहोचविण्यासाठी या उपक्रमाचा लाभ व्हावा, असे डॉ. कोहली यांनी सांगितले. प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीएसटी-सैफ केंद्राचे काम योग्य पद्धतीने सुरू असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी स्वागत केले. डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले. त्यांनी या केंद्राच्या उपक्रमांना कुलगुरू, विद्यापीठ प्रशासनाचे चांगले पाठबळ मिळत असल्याचे सांगितले.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी विज्ञान जागृती सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

या विज्ञान सप्ताहानंतर विद्यापीठांनी अन्य विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांसमवेत सामंजस्य करार करून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान जागृतीचे कार्य सुरू ठेवावे. उदयोन्मुख संशोधकांना बळ द्यावे. 'स्तुती' उपक्रमाचा दुसरा टप्पा या माध्यमातून राबवावा, असे डॉ. कोहली यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, विद्यार्थ्यांना नवसंशोधनाबाबत अनेक संधी उपलब्ध असून, त्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

### ७०० विद्यार्थ्यांचा सहभाग

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे, वैज्ञानिक संशोधन विकासाबद्दल गोडी निर्माण व्हावी, यासाठी देशभरातील १३ केंद्रांची (हब) निवड करून तेथे विज्ञान जागृती सप्ताहाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. या सप्ताहात विद्यापीठ परिक्षेत्रातील १४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील रोज १०० या प्रमाणे एकूण ७०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. त्यांना तज्ज्ञ हे विज्ञानविषयक मार्गदर्शन करणार असल्याची माहिती डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

**Lokmat 22/02/2022**

# विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे आज उद्‌घाटन

## एसएआयएफ- डीएसटी केंद्राच्या वतीने २२ ते २८ दरम्यान आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्राच्या वतीने २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहाचे उद्‌घाटन २२ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार शाम सुंदर कोहली,


किरण ठाकूर


प्राजक्त तनपुरे

'तरुण भारत' समूह प्रमुख, सल्लागार संपादक किरण ठाकूर उपस्थित राहणार आहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशातील सर्व राज्यात विज्ञान सप्ताहाचे आयोजन केले आहे.

शिवाजी विद्यापीठतर्फे आयोजित विज्ञान सप्ताहात प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. आर के कामत, शिवाजी विद्यापीठ जैवतंत्रज्ञान विभागाचे डॉ. व्ही. ए. बापट, विज्ञान विषयक लेखिका डॉ. माधुरी शानभाग, भौतिक शास्त्र विभागाचे डॉ. एम. व्ही. टाकळे, मराठी विज्ञान विश्वकोश मंडळाच्या जीवशास्त्र ज्ञानमंडळाचे अध्यक्ष डॉ. मोहन मदवण्णा मार्गदर्शन करणार' आहेत.

**Tarun Bharat : 22/02/2022**

# विज्ञान जागृती सप्ताह आजपासून

टेंबलाईवाडी, ता. २१ : आजादी का अमृत महोत्सवाचे औचित्य साधून भारत सरकारच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा प्रशिक्षण (STUTI) कार्यक्रम अंतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ ते २८ फेब्रुवारी दरम्यान विज्ञान जागृती सप्ताह होत आहे. त्याचे उद्‌घाटन राजर्षी शाहू सभागृहात उद्या (ता. २२) सकाळी साडेदहा वाजता होईल. विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्रातर्फे त्याचे आयोजन केले आहे. यावेळी भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार श्याम सुंदर कोहली उपस्थित राहणार आहेत.

**Sakal 22/02/2022**

# पर्यावरणाचे संरक्षण समाजाची जबाबदारी

## केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधन करून समाज आणि पर्यावरण याचा समतोल राखण्यासाठी नेहमी संशोधक प्रयत्न करीत असतात. वेगवेगळ्या सुविधा निर्माण करतात. परंतु पर्यावरणाच्या संरक्षणाची जबाबदारी समाजाची आणि स्थानिक उद्योगांची आहे, असे आवाहन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली केले. विद्यापीठातील कार्यक्रमानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला.




कोल्हापूर : विद्यापीठातील विज्ञान सप्ताहाच्या उद्घाटनानंतर पत्रकारांशी संवाद साधताना केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली. सोबत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. जी. सोनकवडे.

डॉ. श्याम कोहली म्हणाले, शास्त्रामध्ये वारंवार बदल होत असून नवनवीन शोध लावले जातात. भारत सरकार विद्यापीठांसह महाविद्यालयांनाही अनुदान देते. डीएसटी-फिस्टअंतर्गत शिवाजी विद्यापीठात सहा प्रकल्प सुरू आहेत. त्याचप्रमाणे डीएसटी-पर्स, डीएसटी-सैफ, डीएसटी-साथी, डीएसटी-सर्ब यांसह रामानुजन फेलोशिप आदी बाराहून अधिक उपक्रम व प्रकल्प येथे सुरू आहेत. विकसित साधनसुविधांचा लाभ विद्यापीठाने संशोधक विद्यार्थ्यांना करून द्यावा. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयक गोडी निर्माण करण्यासाठी त्यांच्यापर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठीही विज्ञान सप्ताह हा उपक्रम आहे. देशभरातील १३ केंद्रांची (हब) निवड करून तेथे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठाचा समावेश केला आहे. समाजाने प्रगती करीत असताना पर्यावरण संवर्धन केले पाहिजे.

ते म्हणाले, भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम देशातील सर्व राज्यांसह केंद्रशासित प्रदेशात १२ मार्च २०२१ पासून पुढील ७५ आठवडे राबविण्यात येत आहे. याअंतर्गत भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे, हा उद्देश आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. अलोक जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते.

**Tarun Bharat : 22/02/2022**

④



कोल्हापूर : विज्ञान जागृती सप्ताहाला मंगळवारी शिवाजी विद्यापीठात 'तरुण भारत'चे समूह प्रमुख व सल्लागार संपादक किरण ठाकुर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रारंभ झाला. यावेळी व्यासपीठावर डावीकडून डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर.जी. सोनकवडे, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, किरण ठाकुर, विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत.

# सौर ऊर्जेचा वापर केल्यास भारत जगात अव्वल!

प्रतिनिधी
कोल्हापूर

जगात शांतता नांदावयाची झाल्यास शांतीप्रिय भारताने महासत्ता बनून जगाचे नेतृत्व करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहणार आहे. त्यामुळे तरुणांनी शास्त्रज्ञ होण्यासाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. विजय भटकर, डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्याप्रमाणे भारावून जाऊनच काम केले पाहिजे. प्रत्येक क्षेत्रात सौर ऊर्जेचा (सोलर एनर्जी) वापर केला तर भारत जगातील नंबर वन देश होईल, असे प्रतिपादन 'तरुण भारत' समूह प्रमुख, व सल्लागार संपादक किरण ठाकुर यांनी केले.

'आजादी का अमृत महोत्सवा'चे औचित्य साधून डीएसटी-स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताह आयोजित केला आहे. या विज्ञान सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून किरण ठाकुर यांनी मार्गदर्शन केले. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात विविध शाळांचे विद्यार्थी, विद्यार्थिनींचा सहभाग होता.

किरण ठाकुर म्हणाले, १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर आपल्याला स्वातंत्र्य मिळण्यास तब्बल ९० वर्षे लागली. इंग्रजांनी आपल्या स्वातंत्र्य दिलेले नाही तर आपल्या स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्ययोद्ध्यांनी

पान ९ पहा



- 'तरुण भारत' समूह प्रमुख, सल्लागार संपादक किरण ठाकुर यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात विज्ञान सप्ताहाचे उद्घाटन
- विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. शाम कोहली यांची प्रमुख उपस्थिती

### किरण ठाकुर यांचा गौरव

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या कार्यक्रमात 'तरुण भारत'चे समूह प्रमुख व सल्लागार संपादक किरण ठाकुर यांचा सत्कार करण्यात आला. प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते ठाकुर यांना गौरविण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी ठाकुर यांच्या कार्यावर गौरवोद्गार काढले.

Tarun Bharat : 22/02/2022

# सौर ऊर्जेचा वापर केल्यास भारत जगात अव्वल!

पान १ वरुन

त्याग, बलिदान देत स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. आजच्या पिढीने स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

किरण ठाकुर म्हणाले, १७, १८ आणि १९ व्या शतकात युरोपला नामवंत शास्त्रज्ञ लाभले. त्यांनी मानवी जीवन बदलविणारे विविध प्रकारचे नवनवीन शोध लावले. त्या काळात आपला देश पारतंत्र्यात, गुलामगिरीत होता. त्यामुळे शास्त्रज्ञ तयार होऊ शकले नाहीत. आपल्या देशाला ऋषी, मुनीची परंपरा असताना, योगविद्येसारखी शक्ती असताना शास्त्रज्ञ तयार होण्यास स्वातंत्र्यानंतरचा काळ यावा लागला.

स्वातंत्र्यानंतर भारतातील शास्त्रज्ञांनी काय केले हे सांगण्यासाठी 'आजादी का अमृत महोत्सव' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तरुणांनी मनात घेतले तर २०५० मध्ये मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील शक्तिशाली भारत होईल, असे सांगून किरण ठाकुर म्हणाले, १९१८ मध्ये जगभरात फ्ल्यू साथ आली. अमेरिकन सैनिक ज्या ठिकाणी गेले तेथे त्यांनी फ्ल्यू पसरविला. १ कोटी २० लाख लोक मृत्युमुखी पडले. शंभर वर्षांनी आज चीनने कोरोनाच्या विषाणूचे जैविक हत्यार करून जगाचे नुकसान केले. त्यामुळे भारतीय शास्त्रज्ञांनी शोध लावून मानवी आयुष्य सुखकर करावे. नव्या पिढीतील शास्त्रज्ञांनी ही जबाबदारी पार पाडावी.

**जागतिक शांततेसाठी भारत शक्तिशाली बनणे आवश्यक**

जागतिक स्थितीवर भाष्य करताना किरण ठाकुर म्हणाले, आज जगात अमेरिका, रशिया, चीन हे शक्तिशाली देश आहेत. पण जगात जर शांतता नांदायची असेल तर भारताला शक्तिशाली देश बनून जगाचे नेतृत्व करावे लागेल. आपल्या देशात ती क्षमता आहे. शास्त्रज्ञांच्या जोरावर आपण शक्तिशाली बनू शकतो. त्यासाठी सौरऊर्जा अर्थात सोलर एनर्जीचा वापर संशोधनासह सर्वच क्षेत्रात वाढविला पाहिजे, असे ठाकुर यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानातील संधी पोहोचविण्यासाठी स्तुती उपक्रम : डॉ. कोहली**

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली म्हणाले, केंद्र सरकारने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'स्तुती' हा उपक्रम हाती घेतला आहे. विद्यापीठीय परीघाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानातील संधींची माहिती पोहोचविण्यासाठी या उपक्रमाचा लाभ व्हावा.

**विद्यार्थ्यांनो प्रश्न विचारा, शंकांचे समाधन करून घ्या : कुलगुरू डॉ. शिर्के**

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण आणि अभ्यासाचा मंत्र दिला. ते म्हणाले, विद्यार्थीदशेत प्रश्न पडणे प्रगतीच्या शक्यतेच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या शंकांचे समाधान करवून घेणे महत्त्वाची बाब आहे. विद्यापीठात ज्ञानसंवर्धनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. डीएसटीच्या माध्यमातून येथे अनेकविध प्रकल्प आणि साधनसुविधा उपलब्ध आहेत. त्यांची माहिती घेऊन विद्यार्थ्यांनी येथून बाहेर पडताना उराशी एक स्वप्न बाळगावे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविकात शिवाजी विद्यापीठाने विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात केलेल्या संशोधनाची माहिती दिली. तसेच शास्त्रज्ञ तयार करण्यासाठी विविध विज्ञानशाखांत असलेल्या सुविधा, साधनांविषयीही अवगत केले.

विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

**कार्यक्रमात शाळा, ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग**

कार्यक्रमाला किसनराव मोरे हायस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज सावरवाडी, कमला कॉलेज ज्युनिअर कॉलेज, देवाळे विद्यालय अॅन्ड ज्युनिअर कॉलेज देवाळे, एस. एम. लोहिया कॉलेज, सिध्दनेर्ली हायस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, गुरूवर्य गुरूनाथ विठ्ठल पाटील ज्युनिअर कॉलेज हलकर्णी, श्रीराम व्ही. पी. देसाई ज्युनिअर कॉलेज, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हास्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, वाय. सी. कॉलेज, सीएचएच. शिवाजी ज्युनिअर कॉलेज पन्हाळा, कोकण एज्युकेशन सोसायटी एस. एस. ज्युनिअर कॉलेज बेळगाव, राजे रामराव ज्युनिअर कॉलेज जत, वत्सलाबाई रामचंद्र दिवटे ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, विटा आदींचे विद्यार्थी उपस्थित होते.

**अखंड भारत जगात शक्तिशाली असता**

इंग्रजांनी जाणीवपूर्वक फूट पाडून अखंड भारताची फाळणी घडवून आणली. भारत, पाकिस्तान फाळणी झाली नसती तर आज अखंड भारत राहिला असता. आपली सैनिकी ताकद जगात सर्वात शक्तिशाली असती. भारत सर्वात शक्तिशाली देश असता, तो शक्तिशाली होऊ नये म्हणून इंग्रजांनी जात, धर्माच्या आधारावर फूट पाडली, फाळणीचेही कारस्थान यशस्वी केले. त्याचे परिणाम आजही आपण भोगत आहोत, याकडे किरण ठाकुर यांनी लक्ष वेधले.

Tarun Bharat : 22/02/2022

# विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानाच्या संधी पोहोचवा

## डॉ. श्याम कोहली : शिवाजी विद्यापीठात विज्ञान सप्ताहाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'स्तुती' हा उपक्रम हाती घेतला आहे. विद्यापीठीय परीघाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानातील संधींची माहिती पोहोचविण्यासाठी या उपक्रमाचा लाभ व्हावा, अशी अपेक्षा केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांनी व्यक्त केली.

'आजादी का अमृतमहोत्सव'चे औचित्य साधून डीएसटी स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात दि. २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित केलेल्या विज्ञान जागृती सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्राच्या वतीने हा उपक्रम आयोजित केला होता.

डॉ. कोहली म्हणाले, 'आजादी का अमृतमहोत्सव' हा उपक्रम देशातील सर्व राज्यांसह केंद्रशासित प्रदेशात १२ मार्च २०२१ पासून पुढील ७५ आठवडे राबविण्यात येत आहे. याअंतर्गत देशभरातील १३ केंद्रांची (हब) निवड करून तेथे हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यार्थीदशेत प्रश्न पडणे, हे प्रगतीच्या आणि यशाच्या शक्यतेच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भीडेवर मात करीत आपल्या शंकांचे समाधान करून घेणे ही फार महत्त्वाची बाब आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार किरण ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी स्वागत केले, तर डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

**Punynagri 24/02/2022**

# वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा : डॉ.शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अलीकडे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानीक दृष्टीकोन नष्ट होत आहे. तो जोपासणे आवश्यक आहे. हा वैज्ञानिक दृष्टीकोन त्यांच्यामध्ये निर्माण. करण्यासाठी डीएसटी-स्तुती अंतर्गत शिवाजी विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलसचिव डॉ.व्ही. एन.शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र विभागात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

'आजादी का अमृत महोत्सवा'चे औचित्य साधून विद्यापीठात दि. २२ ते २८ फेब्रुवारी याकालावधीत विज्ञान जागृती सप्ताह आयोजित केला आहे. याअंतर्गत आज देवाळे विद्यालय आणि जुनिअर कॉलेज, पन्हाळा आणि एसएमजी कॉलेज, कराड येथून आलेल्या शिवाजी विद्यापीठात भेट दिली. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाबद्दलमाहिती दिली. डॉ. सी.व्ही.रमन, विल्यम गिल्बर्ट, जगदीशचंद्र बोस, कुलोम,मायकल फॅरेडे या शास्त्रज्ञांच्या उदाहरणातून वैज्ञानिक दृष्टीकोन पटवून दिला.

डॉ.शिंदे यांचा सत्कार डीएसटी-एसएआयएफ केंद्राचे प्रमुख डॉ.आर. जी.सोनकवडे यांनी केला. अश्विनी पाटील यांनी सुत्रसंचालन केले.

**Pudhari 24/02/2022**

(४)

# विद्यार्थ्यांत विज्ञानसंधी पोचवाव्यात

## डॉ. श्याम कोहली; शिवाजी विद्यापीठात विज्ञान सप्ताहाचे उद्‌घाटन


डॉ. कोहली

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : "केंद्र सरकारने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'स्तुती' उपक्रम हाती घेतला आहे. विद्यापीठीय परिघाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानातील संधींची माहिती पोचविण्यासाठी उपक्रमाचा लाभ व्हावा," अशी अपेक्षा केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांनी व्यक्त केली.

'आजादी का अमृतमहोत्सवा'निमित्त 'डीएसटी-स्तुती' कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ ते २८ फेब्रुवारी कालावधीत आयोजित विज्ञान जागृती सप्ताहाच्या उद्घाटन झाले. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्रातर्फे हा उपक्रम आयोजित केला आहे.

डॉ. कोहली म्हणाले, "आजादी का अमृत महोत्सव' उपक्रम राज्यांसह केंद्रशासित प्रदेशात १२ मार्चपासून पुढील ७५ आठवडे राबविण्यात येत आहे. याअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे, वैज्ञानिक संशोधन विकासाबद्दल गोडी निर्माण व्हावी, यासाठी १३ केंद्रांत उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठाचा समावेश केला आहे. 'डीएसटी'कडून विविध योजना विद्यापीठांना प्रदान करण्यात येतात. त्यापैकी डीएसटी-फिस्टअंतर्गत शिवाजी विद्यापीठात सहा प्रकल्प सुरू आहेत. डीएसटी-पर्स, डीएसटी-सैफ, डीएसटी-साथी, डीएसटी-सर्बसह रामानुजन फेलोशीप आदी बाराहून अधिक उपक्रम, प्रकल्प येथे सुरू आहेत, ही समाधानाची बाब आहे."

डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यापीठात ज्ञानसंवर्धनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. डीएसटीच्या माध्यमातून अनेकविध प्रकल्प, साधनसुविधा उपलब्ध आहेत."

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून तसेच दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी स्वागत केले. डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### सप्ताहांतर्गत उपक्रम

२२ ते २८ कालावधीत प्र-कुलगुरू डॉ. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. कामत, जैवतंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. व्ही. ए. बापट, डॉ. माधुरी शानभाग, भौतिकशास्त्र अधिविभागाचे डॉ. एम. व्ही. टाकळे, मराठी विज्ञान विश्वकोश मंडळाच्या जीवशास्त्र ज्ञानमंडळाचे अध्यक्ष डॉ. मोहन मदवण्णा यांची व्याख्याने होतील. १४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील रोज १०० याप्रमाणे ७०० विद्यार्थी सहभागी होतील. मुलींच्या सहभागासह डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांचा यात समावेश आहे.

Punyanagari 24/02/2022

## वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक : डॉ. व्ही. एन. शिंदे

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन नष्ट होत आहे. हा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्यामध्ये निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'आजादी का अमृत महोत्सवा'चे औचित्य साधून डीएसटी-स्तुती कार्यक्रमांतर्गत २८ फेब्रुवारीपर्यंत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन केले आहे. डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्याला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विज्ञान शिकण्याची आवड असणे महत्त्वाचे आहे. विज्ञानाच्या विविध संकल्पना समजून घेतल्यास यासारखा सोपा विषय नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले.

**Punynagari : 26/02/2022**

## वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



अलीकडे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन नष्ट होत आहे. हा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी डीएसटी-स्तुती अंतर्गत शिवाजी विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

'आजादी का अमृतमहोत्सवा'चे औचित्य साधून डीएसटी-स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात दि. २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. याअंतर्गत बुधवारी देवळे विद्यालय आणि जुनिअर कॉलेज, पन्हाळा आणि एसएमजी कॉलेज, कराड येथून आलेल्या शिवाजी विद्यापीठात भेट दिली.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, आपल्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असल्यास आपण कोणत्याही समस्येवर सहजपणे मात करू शकतो. डॉ. शिंदे म्हणाले, शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा योग्य वापर करणे गरजेचे आहे.

यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा सत्कार डीएसटी-एसएआयएफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केला. सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले, तर आभार डॉ. सोनकवडे यांनी मानले.

**Pudhari : 26/02/2022**

# संशोधनातील सर्व क्षेत्रात गणित गरजेचे : डॉ. मद्वाना

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : 'ग्रामीण विद्यार्थ्यांनी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेसह किशोर विज्ञान प्रोत्साहन योजनेसाठी प्रयत्न करावेत. संशोधनातील सर्व क्षेत्रांत गणित गरजेचे असल्याने उच्च माध्यमिक शिक्षणादरम्यान हा विषय सोडू नये,' असे प्रतिपादन डॉ. दयानंद कॉलेजचे डॉ. मोहन मद्वाना यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित विज्ञान जागृती सप्ताहात ते बोलत होते. यावेळी रसायनशास्त्र विभागाचे प्रा. एस. डी. देळेकर व एसएआयएफ-डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

प्रा. मद्वाना यांनी सोलापूरचे समीर मित्रगोत्री, भारतीय नौदलातील संशोधन सहाय्यक भाग्य स्वामी, डीआरडीओच्या क्षेपणास्त्रांना सोल कोटिंग करून देणारे संदीप सोले यांची उदाहरणे सांगितली. वैज्ञानिक संकल्पना मराठीमध्ये समजून घेण्यासाठी 'मराठी विश्वकोश मोबाईल ॲप' वापराचा सल्ला त्यांनी दिला.

सप्ताहादरम्यान गुरुवर्य गुरुनाथ विठ्ठल पाटील ज्युनियर कॉलेज (हलकर्णी) व श्रीमान व्ही. पी. देसाई ज्युनिअर कॉलेज (कोवाड, ता. चंदगड) येथील शंभर विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला भेट दिली. त्यांना संजय घोडावत विद्यापीठाच्या प्रा. डॉ. एस. आर. पाटील व शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रा. डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व शालोपयोगी साहित्याचे वाटप केले. यावेळी प्रा. एस. डी. देळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. के. व्ही. मोरे यांनी आभार मानले.

**Sakal 26/02/2022**

# उच्च माध्यमिक शिक्षणात गणित विषय सोडू नका : मद्वाना

**कोल्हापूर :** ग्रामीण विद्यार्थ्यांनी भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, किशोर विज्ञान प्रोत्साहन योजना यासाठी प्रयत्न करावेत. संशोधनातील सर्व क्षेत्रांत गणित गरजेचे असल्याने उच्च माध्यमिक शिक्षणा दरम्यान हा विषय सोडू नका. वैज्ञानिक संकल्पना मराठीमध्ये समजून घेण्यासाठी मराठी विश्वकोश, मोबाईल ॲपचा वापर करावा, असे आवाहन करिअर सल्लागार डॉ. मोहन मद्वाना यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील विज्ञान जागृती सप्ताहांतर्गत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भौतिकशास्त्र विभागातील या कार्यक्रमास रसायनशास्त्र विभागाचे प्रा. एस. डी. डेळेकर, एसएआयएफ - डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे प्रमुख उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विज्ञान जागरूकता सप्ताहातून प्रेरणा घेऊन, उद्याचे संशोधक व्हावे, असे आवाहन प्रा. डेळेकर यांनी केले. गुरुवर्य गुरुनाथ विठ्ठल पाटील ज्युनिअर कॉलेज (हलकर्णी), व्ही. पी. देसाई ज्युनिअर कॉलेज (कोवाड) मधील शंभर विद्यार्थ्यांना संजय घोडावत विद्यापीठाच्या प्रा. एस. आर. पाटील, विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाचे प्रा. प्रमोद वासंबेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

**Lokmat : 26/02/2022**

# विज्ञान शाखेत गणित अपरिहार्य : प्रा. मद्वाना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ग्रामीण विद्यार्थ्यांनी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था तसेच किशोर विज्ञान प्रोत्साहन योजना यासाठी प्रयत्न करावेत. संशोधनातील सर्व क्षेत्रांत गणित गरजेचे असल्याने उच्च माध्यमिक शिक्षणादरम्यान हा विषय सोडू नका, असे प्रतिपादन विज्ञान जागृती सप्ताहाच्या चौथ्या दिवशी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे करिअर सल्लागार डॉ. दयानंद कॉलेजचे डॉ. मोहन मद्वाना यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा वाढावी यासाठी 'आजादी का अमृतमहोत्सव' अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील



प्रा. डॉ. मोहन मद्वाना

एसएआयएफ-डीएसटी केंद्राद्वारे विज्ञान जागरुकता सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहादरम्यान ग्रामीण भागातील विविध कॉलेजच्या ७०० विद्यार्थ्यांना येथे भेट देता येईल. या अंतर्गत २५ फेब्रुवारी रोजी गुरुवर्य गुरुनाथ विठ्ठल पाटील जुनि. कॉलेज, हलकर्णी व व्ही. पी. देसाई जुनि. कॉलेज, कोवाड (चंदगड) येथील एकूण १०० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला भेट दिली. या विद्यार्थ्यांना संजय घोडावत विद्यापीठाच्या डॉ. एस. आर. पाटील आणि शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रा. डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्रा. एस. डी. देळेकर म्हणाले, भारत सर्वात जास्त तरुणांचा देश असला तरी वैज्ञानिक क्षेत्रात जागतिक पातळीवर अजूनही पिछाडलेला आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञान जागरूकता सप्ताहातून प्रेरणा घेऊन उद्याचे संशोधक व्हावे.

प्रा. डॉ. मोहन मद्वाना यांचा सत्कार डॉ. एस. डी. देळेकर यांनी केला. यावेळी एसएआयएफ, डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तुकाराम डोंगळे आदींनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले, तर प्रा. के. व्ही. मोरे यांनी आभार मानले.

**Punynagari : 27/02/2022**

# संशोधन क्षेत्र बुद्धिवंतांचे हा गैरसमज

## डॉ. माधुरी शानबाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

एकविसावं शतक बौद्धिक संपदेचे आहे. संशोधन क्षेत्रात चिकाटी, वेगवान कृती आणि अपयशाचा सामना करण्याची तयारी असावी. येथे पैसा-प्रसिद्धीसोबतच सामाजिक कार्य आणि छंद जोपासता येतात. संशोधन क्षेत्र फक्त बुद्धिवंतांचच असते हा गैरसमज असून, साधा शेतकरी, कष्टकरीही नवनवीन शोध लावून संशोधन करत आहे, असे प्रतिपादन बेळगावमधील गोविंदराम सक्सेरिया विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी शानबाग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान सप्ताह सुरू असून शनिवारी पाचव्या दिवशी भौतिकशास्त्र विभागाच्या हॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या प्रमुख पाहुण्या बेळगाव येथील प्राचार्या डॉ. माधुरी शानबाग यांचा सत्कार करताना डॉ. वर्षा जाधव. सोबत डॉ. आर. जी. सोनकवडे.

वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. वर्षा जाधव, एसएआयएफ-डीएसटी केंद्राचें समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे, भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे फेलो प्रो. एस. आर. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे फेलो प्रो. एस. आर. यादव, ग्रंथालय विभागाच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट, सातारा व प्रिन्सेस पद्माराजे ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर येथील शंभर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शालोपयोगी वस्तूंचे वाटप केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. टी. डी. डोंगळे यांनी आभार मानले.

**Tarun Bharat : 27/02/2022**



शिवाजी विद्यापीठाच्यावतीने भौतिकशास्त्र विभागात आयोजित केलेल्या राष्ट्रीय विज्ञान सप्ताहानिमित्त प्राचार्य माधुरी शानबाग यांचे स्वागत प्रा. वर्षा जाधव यांनी केले. यावेळी डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

# संशोधन क्षेत्र बुद्धिवंतांचेच हा गैरसमज : माधुरी शानबाग

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान सप्ताह

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : एकविसावे शतक बौद्धिक संपदेचे असून, संशोधन क्षेत्रात पैसा-प्रसिद्धीसोबतच सामाजिक कार्य आणि छंद जोपासू शकता. हे क्षेत्र बुद्धिवंताचे हा गैरसमज काढून टाकावा, असे प्रतिपादन बेळगावच्या गोविंदराम सक्सेरिया विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य माधुरी शानबाग यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्यावतीने भौतिकशास्त्र विभागात आयोजित केलेल्या राष्ट्रीय विज्ञान सप्ताह व्याख्यानात त्या बोलत होत्या.

प्राचार्या शानबाग म्हणाल्या, संशोधन क्षेत्राबद्दल गैरसमज आहेत. हे अंत्यत रंजक क्षेत्र असून, यासाठी आकलन, स्मृती, विश्लेषण आणि सृजन यासारखे बौद्धिक गुण आत्मसात करत स्वैर विचार करण्याची आवड जोपासायला हवी.

यानिमित्त भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे फेलो प्रा. एस. आर. यादव आणि ग्रंथालय विभागाच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट, सातारा व प्रिन्सेस पद्माराजे ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर येथील शंभर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शालोपयोगी वस्तूंचे वाटप केले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. वर्षा जाधव व एसएआयएफ - डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

**Lokmat 27/02/2022**

# संशोधन क्षेत्र बुद्धिवंतांचे हा गैरसमज काढून टाका : प्राचार्या शानबाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

२१ वेशतकबौद्धिकसंपदेचेअसून, संशोधन क्षेत्रात पैसा-प्रसिद्धीसोबतच सामाजिक कार्य व छंद जोपासू शकता, असे प्रतिपादन गोविंदराम सक्सेरिया विज्ञान महाविद्यालय, बेळगावच्या प्राचार्या माधुरी शानबाग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय विज्ञान सप्ताहात आयोजित व्याख्यानात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. वर्षा जाधव व एसएआयएफ- डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

यावेळी भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे फेलो प्रा. एस. आर. यादव, शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय विभागाच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट, सातारा व प्रिन्सेस पद्माराजे ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर येथील शंभर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शालोपयोगी वस्तूंचे वाटप केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. टी. डी. डोंगळे यांनी आभार मानले.

**Pudhari 27/02/2022**

# देश अन् समाजाशी अतुट नाळ असलेला शास्त्रज्ञ

## डॉ. आर. जी. सोनकवडे यांचा यशस्वी विज्ञान प्रवास

**अहिल्या परकाळे**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ४८ शास्त्रज्ञांचा जागतिक क्रमवारीत समावेश आहे. प्रत्येक शास्त्रज्ञांनी आपआपल्या क्षेत्रात भरीव कार्य करून विद्यापीठाचा झेंडा सातासमुद्रापलिकडे फडकवून, विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यामध्ये डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी किरणोत्सर्ग 'न्युक्लिअर ॲन्ड रेडीएशन स्टडी' या विषयावर केलेले संशोधन देशाच्या प्रगतीत मैलाचा दगडच म्हणावा लागेल. मिसाईल मॅन माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा सहवास लाभलेल्या या ध्येयवेड्या शास्त्रज्ञाची देश अन् समाजाशी अतुट नाळ जोडली आहे. आझादीका अमृत मोहोत्सव आंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने 'तरुण भारत'ने त्यांच्याशी संवाद साधत डॉ. सोनकवडे यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.




डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी शैक्षणिक, वैज्ञानिक व सामाजिक क्षेत्रात प्रदीर्घ काळ यशस्वी कारकीर्द गाजवली आहे. 'न्युक्लिअर ॲन्ड रेडीएशन स्टडी' या विषयात त्यांना पेटंटही मिळाले आहे. शास्त्रज्ञ म्हंटले की, समाजापासून दूर राहून, आपल्या विश्वात रमलेले अशीच प्रतिमा असते. परंतू देशसेवा आणि समाजसेवेच्या विचाराने झपाटलेल्या डॉ. सोनकवडे यांनी सरकारच्या मदतीने विद्यार्थ्यांना विज्ञानाचा गोडी लावण्यासाठी विज्ञान सप्ताहाचे आयोजन करून, नामवंत शास्त्रज्ञांची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित व्हावा हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. भौतिकशास्त्रज्ञाची विलक्षणता प्रथम दर्शनी कदाचित समजत नसेल, परंतु देश प्रगती अन् विकासासाठी खूपच महत्वपूर्ण आहे. विज्ञानवेड्या संशोधकाने आयुष्याची जवळपास २७ वर्षे अविरतपणे विज्ञानसेवा केली आहे.

### अशी आहे कारकिर्द

लखनऊ येथील डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठ, स्कूल फॉर फिजिकल सायन्सेसचे प्रमुख, उपयोजित भौतिकशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख, रेसिडेंन्सिअल कोचिंग ॲकॅडमीचे संचालक, राष्ट्रीय मूल्यांकन, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनेक योजनांमध्ये त्यांचे योगदान आहे. नवी दिल्ली येथील भारत सरकार अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाचे संशोधन केंद्र आंतर विद्यापीठीय त्वरक केंद्र, (hetJeea®es Nuclear Science Centre) येथे ते वरीष्ठ शास्त्रज्ञ म्हणून १८ वर्षे कार्यरत होते. दरम्यान Japan Society for Promotion of Sciences (JSPS) येथे गेस्ट शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. राष्ट्रीय पातळीवर सुमारे १०५ पेपर प्रसिध्द झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ९ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पूर्ण केली असून, ८ विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत.

### किरणोत्सर्ग संशोधन

अणुकेंद्राच्या अस्थिरतेमुळे विघटन होण्याची प्रक्रिया होते. त्यामुळे किरणांचे उत्सर्जन होते, त्याला किरणोत्सर्ग म्हणतात. युरेनियम, थोरियम, रेडिअम यासारख्या मूलद्रव्यांमध्ये अदृश्य, अतिशय भेदक आणि उच्च दर्जा असणारी रेडिएशन उत्सर्जित करण्याचा गुणधर्म असतो. अल्फा, बीटा, गॅमा अशा प्रकारची रेडिएशन असतात. कॅलिफोर्नियमसारखे किरणोत्सारी पदार्थ माणसांसाठी धोकादायक ठरतात. आण्विक शस्त्रे, डिटोनेटर्स, औद्योगिक क्षेत्रात धातूकामातील दोष शोधण्यासाठी वापरतात. जाडी, घनता, पातळी यांचे मापन करण्यासाठी, सिरॅमिक वस्तूंमध्ये अन्न परिक्षणात, विविध पिकांवरील संशोधनात, हाडांचा कर्करोग, हायपर थॉयरॉइडिझम तसेच ट्यूमर ओळखण्यासाठी, कृषी क्षेत्रात रोपांचा जलद गतीने वाढ करून, अधिक उत्पन्नासाठी याचा वापर केला जातो. डॉ. सोनकवडे यांनी संशोधनातून तंत्रज्ञानाची अनेक नवनवीन कवाडे उघडी करण्यासाठी अविरत प्रयत्न केले आहेत. डॉ. सोनकवडे यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या 'स्तुती' या विशेष प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठास सुमारे अडीच कोटी रुपयांचा प्रकल्प तत्वत: मंजूर करण्यात आला आहे.

**मैत्री विज्ञानाशी**



विज्ञानामुळेच मानवाने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे. कोणत्याही गहण प्रश्नाचे उत्तर विज्ञानातच सांपडते. विज्ञानाची कास धरली तर प्रगतीचे दरवाजे खुले होतात. विज्ञान विकासाचा पाया असल्याने मानवाने विज्ञान विषयक मूल्यांची जोपासणा केली पाहिजे. शाश्वत विकासासाठी विज्ञानाशी मैत्री केली पाहिजे.

**डॉ. आर. जी. सोनकवडे**

Tarun Bharat : 28/02/2022

13

# छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका

## मुंबई आयआयटीचे प्राध्यापक ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. एन. जगताप यांचे प्रतिपादन : विज्ञान जागृती सप्ताहाचा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वराज्याला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी रायगडावर तोफेचे कारखाने उभे केले. नौदलाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका, असे प्रतिपादन मुंबई आयआयटीचे प्राध्यापक, जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. एन. जगताप यांनी केले.

आजादी का अमृत महोत्सवाचे औचित्य साधून केंद्र सरकारच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील सीएफसी केंद्राच्या वतीने आयोजित विज्ञान सप्ताहाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



कोल्हापूर : विद्यापीठातील आयोजित विज्ञान सप्ताहाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्य वाटप करताना डॉ. बी. एन. जगताप, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत.

शास्त्रज्ञ डॉ. बी. एन. जगताप म्हणाले, जगामध्ये युरोपात वाफेच्या इंजिनचा शोधाने औद्योगिक क्रांती झाली. पुरातन भारतही विज्ञाननिष्ठ होता, पण वाफेच्या इंजिनचा वापर भारतातील कामगारांनी केला असता तर सध्याचे चित्र वेगळे असते. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विज्ञानाची ओळख करून देणे अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विज्ञानाबरोबरच इतर कौशल्य देखील विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत. विविध विभागांचे संशोधक विद्यार्थी, कर्मचारी आणि प्रशासकीय अधिकारी यांनी विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थी संशोधनात अग्रस्थानी राहतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत. यामधूनच नवीन संकल्पना जन्मास येतात, या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी आपली आवड ओळखून आवडीच्या क्षेत्रातच करिअर करावे. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, विद्यापीठाला भेट दिलेल्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधून नवीन संशोधक निर्माण व्हावेत, अशी आशा आहे. सीएफसी केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले.

Tarun Bharat : 01/03/2022

(14)

(15)

# छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिकावी

## प्रा. बी. एन. जगताप; विद्यापीठातील विज्ञान जागृती सप्ताहाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्वराज्याला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी रायगडावर तोफेचे कारखाने उभे केले. नौदलाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिकावी, असे प्रतिपादन मुंबई आयआयटीचे प्रा. ज्येष्ठ शास्त्रज्ञ बी. एन. जगताप यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी केंद्रातर्फे आयोजित विज्ञान साप्ताहाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. जगताप म्हणाले, विज्ञान फक्त शहरापर्यंत मर्यादित राहिले, तर कोणतेही शाश्वत बदल होणार नाहीत. मात्र, असे उपक्रम राबवून दुर्गम भागात विज्ञान पोहोचण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे.



**कोल्हापूर : शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ बी. एन. जगताप, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील. डॉ. आर. के. कामत आदी.**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'स्तुती' उपक्रमांतर्गत निवड झालेल्या देशभरातील १३ विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. विज्ञानाबरोबरच इतर कौशल्येदेखील विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत. यातून कुतूहल निर्माण होते. नवीन संकल्पना जन्मास येतात. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे आधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी मनोगत व्यक्त केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सीएफसी केंद्राचे संचालक आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले.

**Pudhari : 03/03/2022**